जा.क्र./म.स.के./शिवणी / 683 /२१
शिवणी विभाग, म.स.के.
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
दि. 27/8/2021

# जाहीर लिलाव नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत शिवणी विभाग येथील एका शेततळ्याचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता जाहीर लिलाव दिनांक 09/09/2021 रोजी दुपारी 3.30 वाजता शिवणी विभागाचे प्रांगणात करण्यात येणार आहे.

तरी सर्व इच्छुक व्यक्तींनी शिवणी विभाग येथे वरील वेळेत बोली बोलण्याकरिता उपस्थित राहावे. लिलावाचे नियम व अटी कार्यालयीन वेळेत या कार्यालयामध्ये पहावयास मिळतील.

प्रभारी अधिकारी
शिवणी विभाग, म.सं.के.
डॉ.पं. दे. कृ. वि. अकोला

# जाहीर लिलावाच्या अटी

शिवणी विभागावरील परिसरातील एका शेततळ्याचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता जाहीर लिलाव दिनांक 09/09/2024 रोजी दुपारी 3.30 वाजता शिवणी विभागावर करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

- शिवणी विभागावरील दोन शेततळ्यांचा फक्त मत्स्य पालन/व्यवसाय करिता समावेश आहे.
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये 1000/- नगदी अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी रुपये 1000/- अमानत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल. कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही. विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- लिलावाची अपेक्षित किमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
- बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला ह्यांचे मंजुरी नंतर हि बोली मान्य अथवा अमान्य असल्याची लिलावाच्या तारखेपासून तीन दिवसाचे आत संबधित ठेकेदार/व्यापारी यास सूचित करणायत येईल.
- लिलावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्या खरेदीदारास त्या बाबतची सूचना मिळाल्यानंतर लिलावाची ७५% रक्कम त्वरीत भरावी लागेल, व उर्वरित २५% रक्कम सात दिवसांचे आत भरावी लागेल.
- खरेदीदारास अंतिम बोलीच्या १० टक्के रक्कम security deposit म्हणून जमा करावी लागेल. सदर रक्कम लिलावाची मुदत संपल्यानंतर खरेदीदाराने रीतसर अर्ज करून व पावती जोडून परत करून घ्यावी.
- मत्स्य पालन/व्यवसाय करतांना कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करून द्यावी लागेल अन्यथा security deposit जप्त करण्यात येईल. व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला यांचे कडे राहील.
- शेततळ्यांचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता अंतिम बोलीस मान्यता मिळाल्यानंतर खरेदीदारास रु. १००/- च्या stamp पेपर वर करारनामा करून द्यावा लागेल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- मत्स्य पालन/व्यवसाय करण्याकरिता मत्स्य बीज व मत्स्य खाद्य टाकण्याची पूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील.
- मत्स्य पालन/व्यवसाय करतांना त्याच्या सुरक्षेबाबतची संपूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील. चोरी होणे, नैसर्गिक हानी, जीवित हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

- खरेदीदाराने रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी शिवणी विभाग यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- जाहीर लीलावासाठी प्रस्तावित शेततळ्यातील पाणी शिवणी विभागावरील रब्बी हंगामातील पिकांकरिता आवश्यकतेनुसार वापरण्यात येईल याचे संपूर्ण अधिकार, प्रभारी अधिकारी, शिवणी विभाग यांचे कडे राहतील तसेच याबद्दल कोणतीही तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही.
- मत्स्य / मासोळी काढून नेण्याची अंतिम तारीख ....30/04/2022.................... राहील.

प्रक्षेत्र अधिक्षक
शिवणी विभाग, म.सं.के.
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला